**महाराष्ट्र विधानपरिषद**
**पत्रक भाग-दोन**

**गुरुवार, दिनांक ०३ सप्टेंबर, २०२०/ भाद्रपद १२, शके १९४२.**

**संदर्भ : १) या सचिवालयाचे पत्रक भाग - दोन क्रमांक ५८, दिनांक ४ मे, २०२०**
**२) या सचिवालयाचे पत्रक भाग - दोन क्रमांक ६२, दिनांक १९ जून, २०२०**
**३) या सचिवालयाचे पत्रक भाग - दोन क्रमांक ६९, दिनांक ३ ऑगस्ट, २०२०**

**७८.** सर्व सन्माननीय सदस्यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र विधानपरिषद कामकाज सल्लागार समितीच्या मंगळवार, दिनांक २५ ऑगस्ट, २०२० रोजी झालेल्या बैठकीत महाराष्ट्र विधानपरिषदेच्या आगामी तृतीय (पावसाळी) अधिवेशनाचा कालावधी २ दिवसांचा म्हणजेच सोमवार, दिनांक ७ सप्टेंबर, २०२० व मंगळवार, दिनांक ८ सप्टेंबर, २०२० असा निश्चित करण्यात आला आहे. तसेच सदरहू अधिवेशनात फक्त पुरवणी मागण्या व शासकीय विधेयक घेण्याचे व तारांकित प्रश्न व्यपगत न करता फेरविचारांती अतारांकित स्वीकृत करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार सोमवार, दिनांक ७ सप्टेंबर, २०२० व मंगळवार, दिनांक ८ सप्टेंबर, २०२० या कालावधीकरिता संदर्भाधिन पत्रक भाग-दोनच्या अनुषंगाने या सचिवालयाकडे प्राप्त झालेल्या तारांकित प्रश्नांच्या सूचनांवर कार्यवाही करुन यापुर्वीच विभागाकडे पाठविण्यात आलेले सर्व तारांकित स्वीकृत प्रश्न आता फेरविचारांती अतारांकित स्वीकृत करण्यात आले आहेत.

**विधान भवन,**
**मुंबई**
**दिनांक : ३ सप्टेंबर, २०२०**

**राजेन्द्र भागवत,**
**सचिव**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

**याची प्रत :**

१) महाराष्ट्र विधानपरिषदेचे सर्व सन्माननीय सदस्य.
२) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व कक्ष.
३) संगणक कक्ष वेबसाईट.